
शिवजन्मस्थान

अथवा

शिवनेरीचा प्रवास



लेखक—ना. कृ. आचार्य, पुणे.

किंमत २ आणे.

लेखकाचे दोन शब्द

पुण्यासारख्या चळवळीच्या शहरात राहून लेखकाला आज २०, २२ वर्षे झाला, परंतु अद्याप पुण्यापासून ५५ मैलावर असलेले श्रीछत्रपति शिवाजीमहारज यांचे जन्मस्थान पहाण्याचा योग लाभला नव्हता. हा योग केवळ मोटारी व सायकलींच्या चालू युगामुळेच लाभला यात संशय नाही. शिवनेरी न पाहिलेले असे पुष्कळ लोक अद्याप पुण्यात असतील असे लेखकाला वाटते. त्या सर्वांनी या युगाचा फायदा घ्यावा व हे 'शिवजन्मस्थान' पाहून कृतार्थ व्हावे, अशी मनात तीव्र इच्छा असल्यामुळे हे शिवनेरीच्या प्रवासाचे पुस्तक छापले आहे. हे पुस्तक वाचून बरेच वाचक प्रत्यक्ष शिवजन्मस्थान पाहतील व लेखकाला उपकृत करतील अशी आशा आहे.

आपला—ना. कृ. आचार्य, पुणे.


शिवजन्मस्थान

अथवा

शिवनेरीचा प्रवास.

प्रकरण १ लें.

मोटारची मजा.



१ प्रत्येक हिंदूला पुणे
जिल्ह्यातील अगदी उत्तरे-
कडे असलेला शिवनेरी हा
डोंगरी किल्ला पहाण्याची
इच्छा होणे अगदी स्वाभा-
विक आहे. कारण ज्यांच्या
पराक्रमासुळे हिंदूंचे हिंदुत्व
आज आपल्या दृष्टीस पडत आहे, ते छत्रपति शिवाजी महाराज यांचे
ज्न्मस्थान शिवनेरी किल्ला हा आहे. वास्तविक पहाता हा शिवाजी महा-
राजाबद्दल वाटणारा आदर अलीकडील ठिकठिकाणच्या हिंदुमुसल-
मानांच्या दंग्यापासून सर्व हिंदुस्थानातील हिंदूना अधिक वाढू
लागला आहे. याचे कारण सर्व हिंदूसमोर आपण तीनशे वर्षांपूर्वी
असल्याच परिस्थितीच्या तडाक्यातून कसे निभावलो हा प्रश्न साहजिकच
उभा राहतो आणि त्याचे उत्तर म्हणून आमच्या या शिवरायाची कृतज्ञता-
पूर्वक आठवण झाल्याशिवाय राहत नाही. आम्ही महाराष्ट्रीय शिवराय हा

श्रीशंभूचा अवतार समजतो आणि त्याचा ज्या ज्या ठिकाणाशी काहीना-काही संबंध पोचला आहे ती सर्व ठिकाणे पाहाण्याची आह्माला उत्सुकता उत्पन्न होते. या उत्सुकतेला अनुसरूनच आम्ही काही स्नेह्यानी पुणे ते शिवनेरी हा प्रवास नुकताच केला.

२. पावसाळा संपून गेल्यामुळे सृष्टिसौंदर्य पहिल्या प्रतीचे असणार, ह्मणून आमची उत्सुकता दुणावली व वरील प्रवास पुढे ढकलणे कसेसेच वाटून नजीकचे शनवार आणि रविवार हे दिवस या प्रवासासाठी आम्ही ठरवून टाकले. शनवारचा दिवस उजाडला आणि आम्ही आपआपल्या तयारीस लागलो. ११॥ वाजण्याच्या सुमारास जेवणखाण आटपून आम्ही आपापल्या गाठोड्यासहित मोटार स्टँडवर हजर जहालो. आणि सीटला एकएक रुपया देऊन जुन्नरच्या मोटारीत बसलो. आमच्या बरोबर दोन मुलेही होती. त्यानीही चाकू, मेणबत्ती वगैरे प्रवासात जरूर लागणाऱ्या वस्तूंची, आपल्या स्वभावास अनुसरून मोटारीत बसल्यानंतर, आठवण करून, काही न विसरल्याबद्दल आपली खात्री करून घेतली. मोटारीत बसल्यानंतर सर्व जागा भरून मोटार पुण्याहून निघण्यास पूर्ण एक तास लागला हा वेळ मुलाना मोटारवाल्यांच्या शब्दाचा अनुभव नसल्यामुळे फार त्रासाचा व कंटाळवाणा वाटला. मोटार शनवारवाड्यापासून निघाल्याबरोबर मुलानी ' **श्रीशिवाजीमहाराजकी जय** ' असा मोठ्याने जयजयकार करून मोटारीतील सगळ्या माणसाना आम्ही शिवनेरीस निघाल्याचे जाहीर केले ! आणि आमच्या मनातील सुरू झालेल्या शिवनेरीच्या चिंतनांत भर घातली. जुन्नर पुण्याहून सुमारे ५५ मैल असल्यामुळे तेथे पोचण्याला आम्हास जास्तीत जास्त तीन तास वेळ लागून, आम्ही चारच्या सुमारास जुन्नरास खास पोचणार; व किल्ल्यावर चढून जाण्यास भरपूर वेळ सापडून ठरल्याप्रमाणे किल्ल्यावरच रात्री वस्ती घडणार असे निश्चयाने वाटू लागले.

३ हे विचार चालू असताना आमची मोटार नवा पूल, छत्रपति शिवाजी

महाराजांचा पुतळा, नवीन भांबुर्डा स्टेशन, रेल्वेगेट आणि खडकी स्टेशन या सर्वांना भराभर मागे टाकून चिंचवड रस्ता सोडून जुन्नरच्या मार्गाला लागली. शहरच्या इमारती संपल्या व रानातील विस्तीर्ण जमिनी व शेतकऱ्यांच्या लहान लहान झोपड्या वाटेने लागण्यास सुरवात झाली. लवकरच डाव्या बाजूस एक लहानशा धरणामुळे साठलेला जलसंचय व त्या सभोवतालचा विस्तृत असा हिरवागार तृणाच्छादित प्रदेश यानी आमच्या दृष्टीला प्रेमाने खेचले. परंतु त्या प्रेमाचा स्वीकार आमच्याकडून होतो न होतो तोच आमच्या मोटारीने तो प्रदेश आमच्या दृष्टीआड करून टाकला. मोटारीच्या या वेगाबद्दल आम्हाला किंचित खेद वाटला, परंतु थोड्याच वेळात पन्नास मैल दूर असलेल्या शिवनेरीस नेणाऱ्या मोटारीच्या गुणामुळे आम्ही तक्रार न करता चूप राहिलो.

४ मोटारीने प्रवासाची मोठी सोय केली आहे, यात शंका नाहीं. आज सर्व हिंदुस्थानभर मोटारी धावत आहेत, त्यामुळे जागोजागची ऐतिहासिक ठिकाणे व नैसर्गिक सृष्टिसौंदर्य पाहून लोकामध्ये राष्ट्राभिमान, राष्ट्रप्रेम व राष्ट्रभक्ति उत्पन्न होण्यास मोटार हे एक उत्तम साधन झालेले आहे. अशा तऱ्हेची जलद प्रवास करण्याची साधने निर्माण केल्याबद्दल पाश्चात्य लोकांच्या उद्योगाबद्दल आमच्या मनात आदर उत्पन्न झाला व उलट आमच्या लोकतील आळशी वृत्तीबद्दल विषाद वाटला. असे आमचे विचार चालले असता दूरवर पसरलेले इंद्रायणीचे हिरवेगार झाडीने व्यापलेले खोरे एकदम आमच्या नजरेसमोर आले. लागलीच झाडीमधून चमकणारा शुभ्र पाण्याचा प्रवाह आम्हाला दिसू लागला आणि थोड्याच वेळात इंद्रायणीच्या पुलावर आमची मोटार येऊन पोचली. इंद्रायणीचे सगळे पात्र व्यापून टाकणारा आणि खळखळणारा तो स्वच्छ जलौघ पाहून मन आनंदित झाले नाही तोच मोटारीने नदीचा दुसरा तीर गाठून तो चढण्यास सुरवात केली आणि पूर्वीप्रमाणेच याही वेळी आमचा विरस केला. पूर्वीपेक्षा हा विरस आम्हाला अधिक

जाणवला आणि मोटारीच्या वेगाबद्दल कौतुक न वाटता उदासीनता वाटली. शिवनेरीपर्यंतची मनाला उल्हसित करणारी रमणीय अशी मधली सर्व ठिकाणे अनुपभुक्त स्थितीत भराभर मागे जाणार व फक्त शिवनेरीच पदरात पडणार असे स्पष्ट दिसू लागले. इतक्यात मोटार खडखड वाजू लागली, व मोटार ड्रायव्हरने पंक्चर म्हणून मोटार एका आंब्याखाली खळग्यात थांबविली.

प्रकरण २ रें.

सृष्टिचमत्कार.



५ या वेळीं चाकणच्या अलीकडे अर्ध्या मैलावर आम्ही होतो. चाकणचा शनिवारी बाजार असल्यामुळे त्यासाठी आलेले काही उतारू तेथेच उतरून पायी चालत चाकणास गेले. मोटारचे पंक्चर म्हणजे सबंध एक तास सहज लागणार असे मोटार ड्रायव्हरच्या संमतीने आम्ही ठरवून आता हा एक तास कसा घालवावा याविषयी आम्ही विचार करू लागलों. सर्वांचा एक विचार न होता मुले मोटारच्या हॉर्नशी खेळत पंक्चरदुरुस्ती पाहात तेथे बसली. आमचे स्नेही यास चाकणचा भुईकोट किल्ला पाहण्याची इच्छा उत्पन्न झाली. आणि मी जवळच कोठे एकांताच्या ठिकाणी जाऊन बसण्याचे ठरविले. याप्रमाणे ठरताच, जवळच एक ओघळीला पूल होता त्याजवळ जाऊन मी एकांताचा शोध करू लागलो, ती ओघळ लहानशीच खरी, परंतु आपल्या परीने सृष्टीला शोभवीत होती. सर्व जागा एकांताला अनुकूल अशीच दिसली. तरी एकांताची इच्छा होताच त्याची प्राप्ति होणे बरेच कठीण आहे असे

दिसून आले. तथापि मोटारीच्या लहानशा पंक्चरापासून उत्पन्न होऊन पुढे वाढत वाढत घर, दार, प्रपंच, नोकरी इत्यादिकांचा खेळखंडोबा करून टाकणाऱ्या आणि अनेक प्राप्तव्यांचा पाठीमागे धडपडत धावणाऱ्या मनाला आवरून एकांताच्या मार्गास लावण्यास रानातील सृष्टिशोभेचा शेवटी आश्रय करावा लागला.

६ माझ्या समोर असलेल्या एका मोठ्या झाडावरून एक लहानसा पक्षी उडाला व त्याचे रंगीबेरंगी पंख सूर्यकिरणात चमकले. त्यासरशी माझे मनही मोहित होऊन प्रपंचवृक्षावरून उडाले आणि त्या पक्ष्यापाठीमागे धावले. पक्षी जमिनीत घुसला असे पाहून अधिक आश्चर्यचकित झालेल्या लाडक्या मनाचे कोड पुरविण्यासाठी मीही त्या जागेकडे चाललो. ही जागा त्या ओहोळाच्या काठावर असून आसपासच्या जागेपेक्षा बरीच उंच होती. जवळ जाऊन पाहता तेथे एक पडकी विहीर दृष्टीस पडली. वरील पक्षी जमिनीत शिरल्यासारखा दिसला, तो या विहिरीतच गेला होता. विहीरीच्या काठावर काही झुडपे असून त्यांच्या मुळ्या खाली बिहिरींत लोंबत होत्या, त्यातल्या एका मुळीवर तो पक्षी बसलेला होता. त्याच्या खालच्या बाजूला झारीच्या आकाराचा वाळलेल्या गवताचा बनविलेला एक पदार्थ लोंबत होता, तो त्या पक्ष्याचे घरटे होते, ही गोष्ट इंग्रजी क्रमिक पुस्तकांत दिलेले सचित्र वर्णन आठवल्यामुळे माझ्या ध्यानांत आली; आणि इंग्रज लोक आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे कसे बारीक रितीने लक्ष देतात हे पाहून त्यांच्याविषयी कौतुक वाटले. मीही तो पक्षी व त्याचे ते चमत्कारिक घरटे मुलाना दाखवावे या हेतूने त्याना हाक मारिली. मुले येताच तो पक्षी उडाला व एक गिरकी घेऊन त्या झारीच्या बऱ्याच खाली लोंबणाऱ्या तोटीतून आपल्या घरट्यात जाऊन बसला. ती घरात शिरण्याची बिलक्षण वाट व तऱ्हा पाहून मुलाना मोठी गंमत वाटली.

७ इतक्या अवघड ठिकाणीं अशा तऱ्हेचे लोंबते घरटे बांधून आपल्या शत्रू-

पासून बचाव करण्याचे आपले चातुर्य एवढ्याशा पक्ष्याने प्रकट केलेले पाहून कोणालाहि परमेश्वराच्या करणीचे साश्चर्य कौतुक वाटून त्याचे लक्ष क्षणभर तरी ईशगुणचिंतनात गुंतून राहील यात संशय नाही. त्याच्या मनात ईश्वराच्या अस्तित्वाचा वाद मुळीच शिल्लक राहाणार नाही. ईश्वर आहे, पण तो कोठे आहे ? कसा आहे ? कोणी पाहिला आहे काय, याच्या चौकशीला तो लागेल. ही चौकशी जितकी तीव्र तितकी फलप्राप्ति अधिक सुकर. अशा तऱ्हेने परमेश्वराविषयीच्या विचारात माझे मन गुंतून जाते न जाते तोच मोटारीचे हार्न वाजले व मुले ' मोटार निघाली, चला ! ' असे ओरडत मोटारीकडे पळाली. या गडबडीमुळे पक्ष्याच्या घरट्याशी विचार करीत बसलेले माझे मनही तेथून उडाले आणि मी उभा असलेल्या उंचवट्यावरून दिसणाऱ्या व सभोवार डोंगराच्या पायथ्यापर्यंत पसरलेल्या हिरव्याचार प्रदेशावर भ्रमण करू लागले. प्रत्येक वाऱ्याच्या झुळकीबरोबर खालीवर आंदोलन मिळून गवताळ जमिनीच्या पृष्ठभागावर द्रवरूप पदार्थाप्रमाणे उठलेल्या लाटा पाहून मन फारच मोहीत झाले आणि सूर्यकिरणामुळे त्या ठिकाणी फिरून फिरून उत्पन्न होणाऱ्या मखमलीसारख्या लखाकीने तर ते अगदी भ्रमून जाऊन, हे भोवती पसरलेले गवत आहे की पाणी आहे, की वाळत टाकलेले मखमली वस्त्र आहे, असा त्याला भ्रम झाला ! आणि त्या भासावरच ते क्षणभर स्थिर झाले. परंतु मोटारीचे हॉर्न व मुलांच्या 'चला चला' अशा आरोळ्यानी मनाला ताळयावर आणले व त्याला मोटारीकडे खेचले.



प्रकरण ३ रें.

एक ऐतिहासिक व्यक्ति.



८ मी मोटारीत जाऊन बसलो. जवळ जवळ एक तास संपत आला होता आणि दोन बाजण्याचा समय होता. पूर्वी ठरल्याप्रमाणे त्याच दिवशी शिवनेरीवर वस्ती करण्यास मिळेल किंवा नाहीं याविषयी माझे व मुलांचे मन साशंक झाले. मोटार निघाली, पण आमचे स्नेही आले नव्हते. मी आणि मुले त्यांच्याविषयींतें मागे राहतील या संशयाने थोडे फार उतावीळ झालो. थोड्याच वेळात ते चाकण गावाजवळ बाहेर : रस्त्यावर बाट पाहात उभे असलेले दिसले. मोटार थांबली व आमच्या स्नेह्याना घेऊन पुढे निघाली. ज्याने चाकणचा भुइकोट किल्ला सतराव्या शतकात मोगलांच्या विरुद्ध लढवून शत्रूकडून देखील पाठ थोपटून घेतली, त्या छत्रपती शिवरायाच्या वृद्ध जिवलग स्नेह्याचे पुण्यस्मरण केल्याशिवाय राहवले नाही. या पराक्रमी व्यक्तीचे नाव फिरंगोजी नरसाळा. याला शहाजीने चाकणचा किल्लेदार नेमलेले होते. पुढे दादोजी कोंडदेव याच्या हुकमतीखाली हा होता. दादोजी कोंडदेव परलोकवासी झाल्यानंतर ज्या सरदारानी शिवाजीच्या पुंडाईमधील पवित्र हेतु ओळखला व त्यासाठी सर्वस्व अर्पण केले, त्यांच्यापैकी फिरंगोजी नरसाळा हा एक होता. शिवाजीने त्याचा आपल्याशी एकदिल पाहून त्याच्या ताब्यात आणखी आजूबाजूचा प्रांत दिला.

९ पुढे शाहिस्तेखानाच्या स्वारीच्या वेळी शत्रूचा पहिला जोर फिरंगोजीवर पडला. परंतु त्याने दोन महिनेपर्यंत किल्ला लढविला. किल्याची एक टीचभर देखील जागा त्याने शत्रूचे बळी घेतल्याशिवाय त्याच्याकडे जाऊ दिली

नाही. शेवटी तो व त्याचे उरलेले साथीदार नाइलाजाने शत्रूचे स्वाधीन झाल्यानंतर शाहिस्तेखानाने त्यांच्या पराक्रमाबद्दल त्याला शाबासकी दिली व फिरंगोजीला आपल्या बादशहापाशी हुद्याची जागा देऊं केली. परंतु शिवाजीचा तो खरा दोस्त व नेकीचा नोकर असल्यामुळे त्याने ती नाकारली. पुढे शिवाजीने त्याला भूपाळगडावर किल्लेदार नेमले. नंतर शिवाजीचा मुलगा संभाजी याच्या, शत्रूला सामील होण्याच्या आचरटपणामुळे, शिवाजीच्या—आपल्या धन्याच्या—मुलाशी कसे लढावे या भ्रमात सापडून हृदयावश होऊन तो शिवरायाकडे किल्ला सोडून धावत गेला. शिवाजीला हृदयावश होणारी माणसे नको होती. त्याला कर्तव्यदक्ष माणसे हवी होती. प्रत्यक्ष स्वतःचा मुलगा जरी कर्तव्याच्या आड आला होता, तरी त्याची पर्वा फिरंगोजीने करावयास नको होती. फिरंगोजी स्नेहविकारात सापडून त्याच्या हातून ही चूक घडली, तरी शिवाजीचे मन त्याविषयी साशंक झाले. एका कर्तव्यच्युत होणाऱ्या व्यक्तीच्या बचावासाठी तिचे हृदय तपाशीत बसण्यास शिवाजीस त्या वेळी फुरसत नव्हती. त्यामुळे फिरंगोजी हा तोफेच्या तोंडी देऊन ठार मारला गेला. या शिक्षेबद्दल प्रत्यक्ष फिरंगोजीने स्वतःसुद्धां शिक्षा ऐकल्यावर शिवाजीला दोष दिला नसेल, इतके उदात्त आणि पवित्र असे श्रीशिवाजीचे उद्दिष्ट होते यांत संशय नाही.

१० फिरंगोजी नरसाळ्याचा अशा तऱ्हेचा मृत्यु पाहून आपले हल्लीचे व्यक्तिस्वातंत्र्याचे; देश, धर्म आणि नीति या सर्वांना न जुमानणारे फाजिल अभिमानी शिवाजीला दोष देण्यासही तयार होतील. परंतु अशा लोकानी पूर्ण लक्षात ठेवावे की, धर्मरक्षणासाठी व पारतंत्र्यातून मुक्त होण्यासाठी जो पराक्रमी व बुद्धिमान् लोकांचा जमाव होतो त्यापैकीं प्रत्येक व्यक्ति स्वयंप्रेरणेने एकतऱ्हेच्या कडक शिस्तीने आणि नियमानी स्वतःच्या चुकीसाठी स्वतःला बांधून घेते आणि प्रसंगी देहान्त शासनही सोसण्यास तयार होते. अशा तऱ्हेची संघटित होणाऱ्या सर्व व्यक्तींची तयारी झाल्याशिवाय स्वातंत्र्य

आणि धर्मरक्षण यासारखी पवित्र कार्ये सिद्धीस जात नाहींत. तत्त्व आणि तपशील असा भेद करणाऱ्या लोकांचा शिरकाव त्या तेजस्वी संघात होत नाही. अशा तऱ्हेचा संघ शिवरायाच्या नेतृत्वाखाली बनलेला होता आणि त्या संघातील फिरंगोजी ही एक व्यक्ति असल्यामुळे तिने आपल्या कर्तव्य-च्युतिबद्दल मिळालेले देहान्तशासन आनंदाने पत्करले नसेल असे कोण म्हणेल ? आणि शिस्तीसाठी फिरंगोजीला तोफेच्या तोंडी दिल्याबद्दल शिवाजीला दोष तरी कोण देईल ?

११ कर्तव्यनिष्ठेचे महत्व कायम राखून शिवराय व फिरंगोजी या दोघांचाही मोठेपणा थोडा सुद्धा कमी न करणारे वरील विचार चालले असता, भामा-नदीच्या खडकातून आपटत जाणाऱ्या प्रवाहाच्या गंभीर ध्वनीने ऐतिहासिक व्यक्तीत वावरणाऱ्या मनाला जाग्यावर आणले, आणि त्याच्या स्फटिका-प्रमाणे निर्मळ अशा पाण्याने नेत्राना मोहित केले. परंतु नदीकाठच्या डगरी व झाडे आड येऊन प्रवाह दिसेनासा झाला. पैलतीरावर मोटार गेल्यावर तिचा वेग वाढला व रस्त्याच्या बाजूने मोटारीबरोबर उडणाऱ्या कावळ्याकडे दृष्टी जाऊन त्यांच्यामध्ये लागलेली शर्यत काही काळ पाहाण्यास मिळाली. या वेळी मोटारीचा वेग सुमारे ताशी तीस मैलांचा होता. या वेगाने कावळ्यासारखा लहानसा प्राणी मोटारीबरोबर सहज उडतो हे पाहून मनाला आश्चर्य वाटले. चिमणिसारखा लहानसा पक्षीही आपले लहानसे उड्डाण शंभर मैलांच्या वेगाने सहज करीत असेल हे अनुमान सप्रमाण सिद्ध झालेले पाहून मनाला अचंबा वाटला.

प्रकरण ४ थें.

इतस्ततः



१२ या वेळीं मोटार खेडजवळ आली व पांडुरंग-चरणी धाव घेऊन कृतार्थ होणाऱ्या भीमानदीचा निर्मल प्रवाह ओलांडून ती आतां खेडच्या स्टँडवर थांबली. चाकणचा बाजार असल्यामुळे जुन्नरकडे उलट दिशेला जाणारे उतारू मिळण्याचा फारसा संभव दिसेना. तेव्हा ड्रायव्हरला दहा मिनिटांच्या मोटार चालू करावी लागली. या वेळी दुपारचे अडीच वाजल्यामुळे व निमी वाटही न संपल्यामुळे पाच वाजण्याचे आत आह्मी जुन्नरला पोचणार नाही असे वाटले. ठरल्याप्रमाणे आम्हाला शिवनेरीवर वस्ती करता येईल किंवा नाही याविषयी मनात संशय उत्पन्न होऊन शिवनेरीवरील सद्यःस्थितीची चौकशी मोटारीतील उतारूजवळ करण्यास आह्मी सुरवात केली. कोणी ह्मणाले, वर मुळीच वस्ती नाही. रात्री गावात खाली राहून सकाळी उठून किल्यावर जावे. कोणी ह्मणाले वरती शिवाबाईचे देऊळ चांगले असून श्रवणमासानिमित्त पुजारी रात्री वरतीच असतो व त्यामुळे देऊळ उघडेच सापडेल. या दुहेरी हकीगतीवरून किल्यावर पुजाऱ्याशिवाय दुसरी कोणाचीही वस्ती नाही हे आम्हाला कळून आले.

१३ वस्तीला किल्यावर जाण्याचा हेतु एवढाच होता की, सायंकाळचा वेळ फुकट न जाता डोंगरावरून आसपासच्या अपरिचित प्रदेशाचे सौंदर्य प्रातःकाळी सूर्योदयाच्या अगोदरपासूनच पाहाण्यास मिळावे. आता आमचे

लक्ष सारखे मोटारीकडेच्या वेगाकडे लागले. मोटाराचे यंत्रही त्याच्या आबी-जाबरून सुरळीत चालल्याचे व आपल्या सामर्थ्यानुसार काम करीत असल्याचे दिसून आले. या वेळी आह्मी खेडपासून चार पाच मैल दूर आलो होतो. आणि पेठेचा घाट नुकताच चढण्यास सुरवात झालेली होती. डाव्या बाजूस लांबून येत असलेला एक खोल ओढा दिसत होता. या ओढ्याचे खोरे घाट चढताना बहुतेक सर्व एकदम नजरेस पडत होते. त्यामुळे त्या ओढ्याचा लांबून चमकत येणारा पाण्याचा प्रवाह, त्याच्या काठच्या सुमारे अर्ध्या फर्लांग रुंदीच्या हिरव्यागार शेताच्या पट्टया व दोन्ही बाजूला असलेला डोंगरांचा उभा तृणाच्छादित उतार या सर्वांचे दृश्य मजेशिर खुलत होते.

१४ शेतातून चरणाऱ्या गाईंची वासरे आनंदाने बागडताना पाहून व बैल डुरकताना ऐकून, शहरातून असे कधीही पाहाण्यास मिळत नसल्यामुळे मनाला मोठी गंमत वाटली. या घाटाचा माथा पायथ्यापासून सुमारे पाचशे फूट उंचीवर असून वरच्या बाजूस दहा बारा चौरस मैलांचा विस्तीर्ण पठार आहे. इतक्या उंचीवर एवढा मोठा पठार महाराष्ट्रात क्वचितच मिळेल. याच पठारावर पेठ नावाचे गाव बसलेले असून ते एका चांगल्या ओढ्याच्या काठी आहे. हा ओढा म्हणजे पठाराच्या दोन्ही बाजूस वहाणाऱ्या नद्या-नाल्यापेक्षा पाचशे फूट उंचीवरून खळखळ वहाणारा असा प्रवाह असल्या-मुळे मनामध्ये आकाशगंगेची कल्पना उभी राहते. या पठारावरील विस्तीर्ण शेते पाहून तर ईश्वराच्या करणीचे अधिकच कौतुक वाटते. हा चार मैल रुंदीचा पठार, त्याविषयी चाललेल्या अशा मजेशिर चिंतनामुळे हा हा म्हणता निघून गेला. मोटार खोल खोल जाऊ लागली व थोड्याच वेळात तिने घाटाचा पायथा गाठला व आम्हाला मंचर गावाजवळ आणले. भीमा-शंकराला ज्या रस्त्याने मोटार जाते तो रस्ता मंचरपासून फुटतो.

१५ मोटारस्टँडवर मोटार आल्यानंतर मोटारवाला नारायणगावच्या बाजारास जाणारे कोणी उतारू मिळाल्यास पहावे, म्हणून खाली उतरला.


व आम्ही थोडेसे इकडे तिकडे हिंडू लागलो. स्टँडजवळच शहरी थाटाची दुकाने बांधलेली आम्हाला दिसली. त्यातील एका दुकानाचे पिछाडीस एका मुसलमानाने बांधलेली एक चांगली चाळ आहे. विहिरीला पंप लावून चाळीतील बिऱ्हाडाना नळाने पाणी मिळण्याची सोय केलेली आहे. शौच-कूपांचीही सोय चांगली आहे. शहरच्या लोकाना राहण्यासारखी ही चाळ बांधलेली असल्यामुळे मंचर गावी असलेला बराचसा सरकारी नोकरवर्ग येथेच राहातो. चौकशीअंती एका मुसलमानाकडून असे समजले की, मंचर गावात मुसलमानांची वस्ती बरीच असून तेथे एक उर्दू शाळा चालवली आहे आणि त्या शाळेत जवळजवळ शंभर विद्यार्थी शिकत आहेत. असो. आम्ही अशा रीतीने मंचरचा मोटार स्टँड पाहण्यात गुंतलो असता मोटारीत बसण्याची सूचना आली आणि आम्ही मोटारीत चढून बसलो. मोटार निघाली. आता नारायणगाव हे एकच स्टेशन मधे शिल्लक राहिले. आम्ही घोडनदी ओलांडली. तिचे खोरे आमच्या दृष्टीआड होऊ लागले. थोड्याच वेळात मीना नदीचे खोरे आम्हास दिसू लागले. मीनेचे काठीं असलेले नारायणगावही आमच्या दृष्टीस पडले.

१६ या वेळी साडेचार वाजण्याचा सुमार होता. नारायणगावात न थांबता मोटार तशीच पुढे गेली तरच आम्हास शिवनेरीवर वस्तीला जाणे शक्य होईल असे वाटू लागले. किल्ल्यावर घर करून राहणारे कोणीच नसल्यामुळे शिवाबाईच्या देवळाचीही कल्पना बरोबर होईना. कदाचित देऊळ लहान असून नादुरुस्तही असेल व रात्री निजावयास निवाऱ्याची जागाही मिळणार नाही, अशी शंका मनात येऊ लागली. निर्जन प्रदेशात उघड्यावर निजण्याची मनाची तयारी होईना. या रीतीने एकिकडून मनाचा दुबळेपणा व्यक्त होत असता दुसरीकडून आम्ही ज्या ठिकाणी जाणार होतो ते म्हणजे एका प्रतापी पुरुषाचे जन्मस्थान असल्याची आठवण झाली. या पुरुषाने आपल्या सर्व जन्मात निवारा आणि स्वास्थ्य यांची परवा न करता, हालअपेष्टा सोसून केवळ धर्मरक्षणासाठी

आपले सर्व आयुष्य वेचले, अशा पुरुषाच्या जन्मभूमीचे दर्शन घडण्याचा प्रसंग प्राप्त झाला असतानासुद्धा निवाऱ्याची, सोबतीची वगैरे सर्व सोयीची अपेक्षा धरणे हे मनाला भ्याडपणाचे वाटू लागले. अशा दुहेरी पेचात मन सापडून रात्री वस्ती शिवनेरीवर करावी किंवा खाली जुन्नर गावात, याचा निकाल लागेना. आता मोटार नारायणगावास पोचून जुन्नराकडे निघण्याच्या बेतात होती. बाजारामुळे परत जाणारे बरेच लोक असल्यामुळे शेवटी मोटारीत बरीच गर्दी झाली. तथापि त्यामुळे मोटार फार वेळ न थांबता ताबडतोब नारायणगावाहून निघाली.

प्रकरण ५ वें.

पवित्र दर्शन.



१७ येथून किल्ला दिसतो का, असा मुलानी वारंवार प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. बरोबर घेतलेला नकाशा उघडून पाहता शिवनेरीच्या आड एक डोंगर येत होता. त्याच्या पलीकडे किल्ला असल्याचे मुलाना सांगितलें. आतां शिवनेरी किल्ल्याचे प्रत्यक्ष प्रदर्शन होणार असल्यामुळे डोळे त्या दिशेकडे लागून राहिले. आड असलेला डोंगर हळू हळू बाजूला होत होता शेवटी उत्तरेकडील किल्ल्याचा तुटलेला कडा दिसू लागला; त्याबरोबर शिवाजीची बालमूर्ति डोळ्यासमोर आली! जिजाऊ आईच्या कडेवर बसलेली दिसली! त्या कड्यावरून भोवतालचा प्रदेश पहात असलेली मनःचक्षूनी पाहिली! शिवरायाचा बालपणाचा समग्र सोहळा कल्पनेने रंगविण्यास सुरु केली. साध्वी जिजाऊमाईला शिवराय जन्मला म्हणून किती तरी आनंद

झाला असेल ! ते पुत्ररत्न पाहून प्रसूतीच्या अगोदर वर्तविलेल्या शुभ भवि-ष्याची तिला पुष्कळच खात्री वाटूं लागली असेल. त्याला तिने कसा जपला कसा खेळविला, कसा हिंडविला, याची कल्पना आमच्या वाचकानी करावी ' हाच माझा बाळ आता माझ्या या आर्यभूचे पारतंत्र्य नाहीसे करणार व आर्यधर्माची स्थापना करणार ! ' असे जिजाबाईला किती वेळा तरी वाटले असेल ! कारण पारतंत्र्याची कडू फळे तिला रात्रंदिवस चाखावी लागत होती. आर्यधर्म बुडू लागला होता व सर्व हिंदू पारतंत्र्यात होते. अशा काळांत ती आपली जीवितयात्रा कंठित होती.

१८ स्वतःच्या लग्नाबद्दल श्वशुर व पिता यांच्यामध्ये लहानमोठेपणामुळे लाग-लेले भांडण, तात्पुरता तंटा मिटून नंतर झालेले लग्न, बादशाही दरबारातील कमीअधिक मानामुळे पिता लखूजीराव व पति शहाजी यामध्ये रक्तपाताची सुरू झालेली लढाई, आणि या दोघांचेही परस्परावद्दल ऐकावे लागलेले निष्ठुर शब्द, या सर्वांनी आर्य संस्कृतीत वाढलेल्या त्या जिजाऊ आईच्या हृदयाला बारंवार किती विव्हळ केले असेल, याची कल्पना वाचकानाही असह्य वाटेल. जिजाबाई हुशार व बुद्धिमान होती. तिने या सर्व हाल-अपे-ष्टेचे कारण मुसलमानी सत्ता हे ओळखलेच असेल. आपल्यासारख्या मोठ्या सरदाराच्या मुलीचे या मुसलमानी राज्यात असे हाल, तर इतर आर्य भगि-नींचे काय होत असेल, याचीही काळजी तिला लागून मुसलमानी सत्ताच कशी नाहीशी होईल, हा हिंदुधर्म कसा रक्षण होईल, याच्याबद्दल तिचे सतत विचार चालले नसतील असे कोण म्हणेल ! शिवाजीच्या वेळी गरोदर असताना तर तिचे मनस्वी हाल झाले. या प्रसंगी पति व पिता या दोघां-चाही रोष तिजवर झाला होता. अशा परिस्थितीत माझ्या हयातीतच मुस-लमानी सत्ता नाहीशी करून स्वातंत्र्य प्रस्थापित करणारा सत्पुत्र मला दे अशी प्रार्थना भवानी देवीला जिजाबाईने मोठ्या कळवळ्याने बारंबार केली असली पाहिजे. आणि त्याचमुळे, हे मातापित्यांच्या हृदयाना आपल्या पार-

क्रमाने आल्हाद देणारे पुत्ररत्न जिजाबाईच्या पोटी आले होते.

१८ असे विचार चालले असताना मोटार स्टँडवर येऊन उभी राहिली यावेळी साडेपाच वाजले होते. आम्ही किल्ल्यावरील शिवाबाईच्या देवळा-तच रात्री वस्ती करण्याचे ठरविले. वेळ थोडा असल्यामुळे किल्ल्याच्या वा-टेची लांबी, तिची दिशा वगैरे गोष्टींची माहिती जवळच्या लोकाकडून करून घेतली व आमच्यापाशी असलेला बोजा घेण्यासाठी एक विगारीहि आम्ही घेतला. जुन्नर गांवच्या पेठेतून उत्तर टोकापर्यंत गेल्यानंतर, आमच्या ओझे-वाल्याला वाट माहित नसून जुन्नर गांवही त्याला अपरिचित आहे हे दिसून आले. आणि आम्ही आता किल्ल्यावर जाण्याचे थोडेसे धाडसच करीत आहोत असे आम्हाला वाटले.

१९ वाटेत चौकशी करता किल्ल्यावर देवळात वस्तीला पुजारी अस-ल्याचे काहिंच निश्चित कळेना. तथापि वेळ न घालविता तपास करून नीट वाटेला लागलो. गावाबाहेर पडताक्षणीच वाटेत आम्हाला एक प्रेमळ मराठा वाटसरू भेटला. त्याने वरती असलेल्या देवीच्या देवळाची आम्हाला चांगली कल्पना करून दिली व तेथे रात्री निवाऱ्याची जागा मिळेल असे सांगितले. वाटेत त्याने आम्हाला किल्यावरील गंगाजमुना टाक्याची अद्भु-तता सांगितली. वर शिवाजीमहाराजांच्या जन्म झालेल्या खोलीचे वर्णन केले आणि किल्याच्या पूर्व तटाला दिसत असलेल्या अनेक कोरिव लेण्यांच्या पाय वाटांची माहितीहिं सांगितली. त्याला कुसूर गावाला जावयाचे असल्यामुळे ती वाट फुटल्यावरोबर त्याने आम्हाला आमची किल्याची वाट दाखविली आणि आम्ही वाटेला लागेपर्यंत आपण तेथेच उभा राहिला. दरवाजाच्या आत गेल्यावरोबर देवीचे देऊळ दिसू लागेल असे त्याने ओरडून सांगितले. आम्हीही त्याला कृतज्ञतेने राम राम म्हणून जावयास सांगितले.

प्रकरण ६ वें

सूर्यास्तानंतर



२१ आता तटाची पूर्व बाजू आमच्या नजरेआड होऊन आम्ही किल्याच्य दक्षिण बाजूने चढत होतो. या बाजूला झुडपांची गर्दी बरीच असल्यामुळे आणि त्यावर सायंकाळच्या कोवळ्या सूर्यकिरणांचा प्रकाश पडल्यामुळे आमचे मनरंजन होऊ लागून चालण्याचा वेग बराच मंदावला. मीना नदीचे विस्तीर्ण खोरे दृष्टिपथात आल्यामुळे ती सर्व शोभा पाहत क्षणभर उभेहि राहिलो. आता सूर्य अस्तास जाण्यास फारच थोडा अवकाश असलेला पाहून आमच्या धाडसाची डिग्री वाढत असलेली आमच्या लक्षांत आली व आम्ही इकडे तिकडे न पाहता चढू लागलो. लवकरच दरवाजा लागला. आत काही तरी अंतर चढून गेल्यावर डाव्या हाताला एक मोठी गच्ची असलेली इमारत दिसली, परंतु तिचा दर्शनी भाग पडीक दिसल्यामुळे व आसपास वास्तव्याचे काहीच चिन्ह न दिसल्यामुळे ते देऊळ नसावे असे ठरवून आम्ही पुढे चाललो. परंतु पुढे वाट संपलेली दिसली.

२२ सूर्य अस्तास गेलेला व देऊळ कोठेच दिसेना आणि मुले बरोबर;यामुळे त्या इमारतीविषयी पुरता विचार करण्यासहि सवड नव्हती. आम्ही गवतात पुढे तसेच चालत गेल्यावर एक पायवाट लागली. पायवाट मळलेली दिसली, व त्यामुळे पुढे देऊळ लागेल अशी आशा उत्पन्न झाली. आता आम्ही किल्याच्या पश्चिम तटाजवळून चाललो होतो. वाटेत आम्हाला पाण्याने तुडुंब भरलेली व जवळ जवळ असलेली दोन टाकी लागली. त्यांच्यातील स्वच्छ काळेभोर पाणी पाहून हीच ती आमच्या प्रेमळ मराठ्याने वर्णन केलेली गंगाजमनाची टाकी असावीत असे दिसून आले. याच्याखेरीज पिण्यासारखे

पाणी किल्यावर नसल्यामुळे आम्ही बरोबर असलेला तांब्या भरून घेतला व पुढे निघालो. उजव्या बाजूला असलेल्या उंच टेकडीपलीकडे देऊळ असेल असे आम्हाला वाटले व खात्री करून घेण्यासाठी आम्ही टेकाड चढू लागलो. उत्तरेकडे ज्या दोन पडक्या इमारती दिसत होत्या, त्या तपासून पाहण्याकरतां आमच्यापैकी एकजण तिकडे अगोदरच गेले होते. या वेळी अंधार थोडा थोडा पडू लागला होता.

२३ आता मात्र आम्हाला कधी न आलेला अनुभव येणार असे स्पष्ट दिसू लागले. आसपासचा प्रदेश पूर्ण अपरिचित, आम्ही उभे असलेले ठिकाण म्हणजे किल्ला, हा त्या प्रदेशापासून सुमारे हजार फूट उंच असल्यामुळे अगदी अलग झालेला आणि आमच्याशिवाय या ठिकाणी कोणाही प्राण्याचा अभाव आणि या सर्वांवर ताण करणारा हळू हळू पडत असलेला अंधार, यांच्यामुळे आमची मने थोडीफार डगमगली. देवळासाठीं फक्त आता टेकडीचा माथा धुंडावयाचा राहिला. टेकडीवर गेल्याबरोबर आमच्या समोर लांबून देवळासारखे दिसणारे एक मुसलमानी थडगे दत्त म्हणून उभे राहिले; थडग्याचे चार कोपऱ्याचे चार खांब व त्यावरील उंच घुमट यांच्याशिवाय वारा आणि पाऊस यापासून संरक्षण करणारे तेथे काहीच नव्हते. या थडग्याभोवताली छातीइतका उंच व बराच रुंद असा चौथरा आहे आणि हीच एक प्रशस्त व स्वच्छ अशी वस्तीला जागा दिसली. पलीकडे दक्षिण बाजूला शंभर हातावर दक्षिणोत्तर बांधलेली सुमारे पन्नास फूट-लांब व पंचवीस फूट उंच अशी एक अवाढव्य दगडी भिंत आहे. ती एक बोडकी मशीदच असून आश्रय करण्याच्या दृष्टीने तीही निरुपयोगी ठरली. या वेळी वारा बराच सुटला असून त्यात बराच गारवा उत्पन्न झालेला होता. श्रावणाचा महिना म्हणून पाऊसही येण्याचा संभव होता. अशा स्थितीत चारी बाजूने उघडे असलेले थडगे किंवा फक्त वाऱ्याला थोपविणारी ती भिंत ही दोन्ही, आमच्याजवळ आंथरूण व पांघरूण

चेताचेंच असल्यामुळे रात्रीच्या वस्तीला योग्य ठरनाते. म्हणून आम्हाला आरंभी लागलेली पडकी इमारत तीच कदाचित देऊळ असेल असे वाटून पुनः खात्री करून घेण्यासाठी घाईघाईने त्या दिशेने निघालो. परंतु टेकडीच्या दक्षिण टोकावर जाऊन पाहता ती पडकी इमारत देऊळ असल्याचे चिन्ह काहीच दिसेना. दिवे लागणीची वेळ समीप आली व परत त्या पडक्या इमारतीपर्यंत सर्व मंडळी घेऊन जाण्याला वेळ मुळीच शिल्लक नव्हता म्हणून मी निराश होऊन थडग्याकडे गेलो.

२४ माझे स्नेहीही या वेळी टेकडीच्या तळाशी असलेल्या उत्तरेकडच्या पडक्या इमारती पुनः पाहून आले होते. त्यांनी निवारा असलेली अशी एक मशीद खाली असल्याचे सांगितले व आम्ही सर्व त्या मशिदीकडे गेलो. मशीद पूर्वाभिमुख असल्यामुळे वाऱ्याचा उपद्रव नाहीसा झाला आणि वर गच्ची असल्यामुळे पावसाची भीति उरली नाही. खालची जमीन अस्वच्छ होती, तरी आम्ही तेथेच राहण्याचे ठरविले. तथापि शिवाजीमहाराजांच्या जन्मस्थानी येऊन एखाद्या मशिदीत रात्र घालविण्याची पाळी यावी ही गोष्ट मनाला बरी वाटेना. म्हणून जवळची पडकी इमारत कसली आहे हे नीट पाहण्यासाठी आमचे स्नेही गेले व लागलीच आनंदाने आरोळी ठोकून आम्हा सर्वांना त्यांनी तिकडेच बोलाविले ! आम्हाला वाटले देऊळ सापडले ! आम्ही सर्वजण तिकडे गेलो आणि पाहतो तो श्रीछत्रपति शिवाजीमहाराज ज्या खोलीत जन्मले तीच खोली आम्हास वसतीला मिळाली. रात्रीचा काळोख पडण्यास सुरुवात झाली असल्यामुळे मेणबत्ती लावून ती खोली आतून तपासून पाहिली. खोली दोन गाभाऱ्यांची ऐसपैस असून ऐतिहासिक इमारती दुरुस्त ठेवणाऱ्या आर्किआलजिकल खात्याने आतील भिंतीच्या दरजा भरलेल्या असल्यामुळे ती राहण्यालायक होती. जमीन नादुरुस्त असली तरी ती अस्वच्छ नव्हती. खोलीला जाळीचे का होईना पण दार असल्यामुळे बंदिस्तपणा बराच आला होता. आम्ही सर्वांनी आता

स्वस्थपणाने फराळ केला. नंतर अंथरुणे पसरून पुष्कळ वेळ गप्पा मारीत पडलो. ' जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ' या उक्तींची आठवण होऊन छत्रपति शिवाजीमहाराजाना स्वर्गापेक्षाहि अधिक वाटणारे स्थळ आम्हाला रात्रीच्या वस्तीला लाभल्यामुळें आम्हाला समाधान वाटले. या मिळालेल्या अप्रतिम समाधानाची कल्पना वाचकानीच करावी. श्रीछत्रपति शिवाजीमहाराज जन्माला आले म्हणून आपल्या आर्यधर्माचा पुनर्जन्म झाला व आपणा हिंदुधर्मीयाना अस्तित्व लाभले. ही गोष्ट उघड असूनही श्रीशिवाजी-महाराजांच्या जन्मस्थानाची आठवण हिंदूना व त्यातही महाराष्ट्रीयाना इतकी थोडी असावी, की शिवनेरीवर एकही मनुष्य वस्तीला नसावा, जन्मस्थानी दिवा लागण्याचीही व्यवस्था नसावी; इतर गोष्टीं, उत्सव, समारंभ यांच्या पायी आमचे लाखो रुपये खर्च होत असताना भारतभूमीतील शिवनेरीवरील या स्वर्गाची स्मृति आम्हापैकीं कोणालाही होऊ नये आणि या शिवजन्म-स्थानी सुंदर मंदिर दिसू नये वगैरे दुःसह विचारानी मन बराच वेळ व्यापून राहिले. शेवटी त्या दिवशीच्या बऱ्याच श्रमानंतर झालेल्या अलभ्य लाभाची म्हणजे शिवजन्मस्थानाची आठवण होऊन आम्ही हळूहळू निद्रावश झालो.

प्रकरण ७ वें



अवलोकन

२५ झोंप संपली, प्रभात झाली आणि प्रातः-काळचा प्रकाश हळूहळू वाढत जाऊन त्याने सर्व दिशा व्यापून टाकल्या. आम्हीही सर्वजण शौचमुख-नमार्जे आटोपून चोहकिडे लीलेने भटकण्यास तयार झालो. पाहण्याच्या शिल्लक राहिलेल्या गोष्टी म्हणजे, १ किल्ल्यावर येताना प्रथम लागलेली पडकी परंतु

मोठी इमारत, २ शिवाबाईचे देऊळ आणि ३ तटामध्ये कोरलेल्या लेण्या य फक्त होत्या. प्रथम आम्ही छत्रपतिशिवाजीमहाराज यांचा जन्म ज्या वाड्य झाला, त्या वाड्याची पाहणी केली. हल्लीची जन्मस्थान म्हणून प्रसिद्ध अ लेली खोली एका मोठ्या वाड्याचा अवशिष्ट भाग असून बाकी सर्व वा जमिनदोस्त झालेला दृष्टीस पडतो. या वाड्याचे दोन भाग होते असे दिसत उत्तरेकडचा भाग चौसोपी असून मधोमध मोठा चौक व कारंजा असाव असे अवशिष्ट भागावरून दिसून येते. याच भागात हल्लीची प्रसिद्ध असलेल जन्मस्थानची खोली आहे. दक्षिणेकडच्या भावाचा विस्तारही उत्तरभागाएव ढाच असून त्यात बऱ्याच खोल्या व दालने होती असे दिसून येते. य भागातही एक अवशिष्ट खोली असून ते स्नानगृह असावे असे तिच्या रचने वरून वाटते. या खोलीतील कमानीची मेहेरप पाहिली म्हणजे ही इमार हिंदूनीच बांधलेली असवी अशी खात्री होते. या वाड्याचा सर्व भाग छत्र पतिशिवरायांचे हात, पाय व अंग यांच्या स्पर्शानी पवित्र झाले असल्यामु सर्वांविषयीं आदरबुद्धि जागृत झाल्याशिवाय राहात नाही. आणि हीच बुि सर्व किल्ला अवलोकन करीत असताना टिकून राहते.

२६ असो आम्ही शिवरायाचा बालपणाचा वाडा पाहिल्यानंतर प्रातःकालच्या सूर्यकिरणानी सुवर्णकांति लाभलेली पश्चिमेकडील गिरीशिखरे अवलोकन करीत करीत आल्या वाटेने परत फिरलो. वाटेत स्वच्छ पाण्याने तुडुंब भर- लेल्या गंगाजमना टाक्यानी आम्हाला क्षणभर मोहित केले. नंतर आम्ही वर येताना प्रथम लागलेली पडकी इामरत पाहिली. ही बरीच मोठी असून बरं गची आहे. आत चोहिकडे ओहऱ्या असून ही जागा पागा म्हणून प्रसि आहे. ही पाहून थोडेसे खाली उतरताच दक्षिण तटाच्या तळाशी कौल इमारत आम्हाला दिसली. हेच ते शिवाबाईचे देऊळ अशी आमची सर्वां खात्री झाली. देऊळ किल्ल्यावर आहे अशा समजुतीने आम्ही ते धुंडले होते. आम्ही देवळाजवळ गेल्यावर दोही बाजूला देवड्या असत

बाजालून आत गेलो. देऊळ दक्षिणाभिमुखी असून ते तटाच्या तळाशी पून मधेच असल्याचे कळून आले. उत्तरेकडे उंच तट, दक्षिण व पूर्व जूला तुटलेला कडा आणि पश्चिम बाजूला वरील दरवाजा या सर्वांमुळे देऊळ सुरक्षित असे आहे. भोवताली फरसबंदी खुली जागा आहे. देवळाचा मंडप चांगला व प्रशस्त असून देवीचा गाभाराहि तसाच प्रशस्त आहे. देवी वाहनरहित असून उभी आहे. हातात भाला वगैरे आयुधे आहेत. चेहरा व दृष्टि परिणाम करणारी असून त्यानीच शिवाजीमहाराजांच्या सद्भावना व धर्मश्रद्धा जागृत केल्या असल्या पाहिजे असे पाहणारास वाटल्याशिवाय राहत नाही. देवीचे दर्शन घेऊन, भवानी देवीवरील महाराजांची दृढ श्रद्धा व तिच्यामुळे त्यांच्या हातून घडलेले महत्कार्य यांचे चिंतन करीत करीत आह्मी बाहेर पडलो. फरशीवर आल्यावर सर्वांनी थोडा फराळ केला; व नंतर लेणी पाहण्याकरता निघालो. परंतु शिवजन्मस्थान व देवी भवानीचे देऊळ यांचा विरह पावलोपावली वाढत जाऊन लेण्यात काय विशेष आहे असे आमच्या तोंडून उद्गार निघाले. व जवळजवळशून्य दृष्टीनें दोन तीन लेण्या पाहून आह्मी खाली उतरू लागलो. वाटेत लहान लहान लेण्या पुष्कळ लागल्या. गावाजवळ आल्यावर फिरून एकदा आह्मी परतून किल्ल्याकडे पाहिले. शिवजन्मस्थान चांगले उंच असे दिसले. ज्याच्याकरता आलो, ते सर्व संपले असे वाटून आह्मी आपली वाट धरली. वाचकानो पंचपक्वान्नाचे अनपेक्षित रुचीचे भोजन यथाशक्ति पकवून आपल्याला घातले. आतां उष्ट्या खरकट्याच्या भानगडी सांगणारा व ऐकणारा या दोघानाहि प्रिय नसल्यामुळे आपली सर्वांची येथेच रजा घेतो.

